SHSRC
Maharashtra

# राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र

## महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, ॲनेक्स इमारत,दुसरा मजला,
पुणे रेल्वे स्टेशन मागे, पुणे - ४११००१ (टेलीफॅक्स - ०२० २६०५७५०१/१०)
E-Mail: shsrc.gom@gmail.com

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

क्र.राआयसंके/ DAC review of minutes दरपत्रके/ 2427 /१७
दिनांक ...../०६/२०१७ 20/7/2017

प्रति,
मे ......................
......................
......................
......................

**विषय** – UNFPA अंतर्गत राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली Rapid assessment to understand functioning of District & Corporation Advisory Committee and review of minutes या विषयाचा अभ्यास पूर्ण करुन अहवाल तयार करुन देणेसाठी एजन्सी/consultant ची नेमणूक करणे बाबत.

आपणांस या पत्राव्दारे कळविण्यात येते की माहे जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील जिल्हा व मनपा कार्यालयातील सल्लागार समितीचे बैठकीचे इतिवृत्ताचा अभ्यास करावयाचा आहे. या अभ्यासादरम्यान प्रामुख्याने खालील ३ गोष्टीच्या अनुषंगाने त्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. हा अभ्यास कामकाज नियुक्ती आदेश दिल्यानंतर तात्काळ तीन महिन्यात पूर्ण करावयाचा आहे. सविस्तर विश्लेषण करणे आवश्यक आहे. इतिवृत्त, माहिती अहवाल, डेटाचे संकलन, पडताळणी, क्लिनिंग, विश्लेषण, व अहवाल लेखन हया बाबी पूर्ण कराव्या लागतील. सदर कामकाजाचा तपशील खालीलप्रमाणे

| अक्र | पीसीपीएनडीटी जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीचे अहवालाचा अभ्यास करणे बाबत (जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६) | दर रुपये (सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| १) | जिल्हा सल्लागार समिती नवीन सोनोग्राफी केंद्राच्या नोंदणीस मंजूरी, सोनोग्राफी केंद्राच्या कामात अव्यवस्थितपणा आढळून आल्यास रजिस्ट्रेशन कॅन्सल, किंवा सोनोग्राफी केंद्राचे नोंदणी स्थगिती करतात. हयाचा अभ्यास करणे. | |
| २) | जिल्हा सल्लागार समिती ही पीसीपीएनडीटी कायदयात तरतूद केल्याप्रमाणे त्याच्या कामाच्या पध्दतीत सुसूत्रता आहे किंवा कसे यांचा अभ्यास करणे. | |
| ३) | जिल्हा सल्लागार समिती ही पीसीपीएनडीटी ॲक्ट प्रमाणे झालेल्या सर्व बैठकीचे इतिवृत्त कशाप्रकारे नोंद करते हयाची पहाणी करणे. | |

उपरोक्त कामांची पडताळणी व अभ्यास करणे व अंतिम अहवाल सादर करण्याची अंतिम मुदत तीन महिने आहे.

तेंव्हा आपण उपरोक्त प्रस्तावित केलेनुसार अभ्यास करणेसाठी इच्छूक असल्यास खालील अटी व शर्तीप्रमाण आपले दरपत्रक या कार्यालयास ही नोटीस (सूचना) संकेतस्थळावर प्रसिध्द होताच ७ दिवसात (दि. 21./०7/२०१७ पर्यंत) या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवावेत.

**अटी व शर्ती**

१) उमेदवाराने मास्टर्स इन पब्लीक हेल्थ ची पदव्युत्तर पदवी धारण केलेले असावे/ उमेदवार हा विधी व न्याय विभागाची पदवी धारण केलेला असावा व पीसीपीएनडीटी विषयाचे ज्ञान असावे

२) उमेदवार जर एखादया संस्थेशी संलग्न असल्यास त्या संस्थेच्या नावाने असलेल्या लेटर हेडवर अंदाजपत्रक सादर करावे

३) उमेदवार वैयक्तीकरित्या देखील दरपत्रक सादर करु शकतात.

४) दर हे सर्व करांसहीत नमूद करावेत.

५) विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येतील अन्यथा नाकारण्यात येतील.

६) दरपत्रकावरील नमूद केलेल्या दरांमध्ये खाडाखोड किंवा अंक गिरविलेले नसावेत.

७) दरपत्रके सिलबंद स्वरुपात पाठवावीत.

८) दरपत्रक मंजूर झालेनंतर उपरोक्त नमूद केलेनुसार दिलेले कामकाज मुदतीत समाधानकारकरित्या पुर्ण करणे आपणांस बंधनकारक राहील. अन्यथा शासकीय नियमानुसार विलंब आकार वसूल केला जाईल.

९) सदर सन २०१६ च्या बैठकीचे सर्व इतिवृत्त आपणास या कार्यालयामार्फत अभ्यासास देण्यात येतील. त्यानुसार आपण सर्व अहवालाचा अभ्यास करुन अंतिम अहवाल या कार्यालयास पाठवावी. सदर माहितीची या कार्यालयामार्फत तपासणी करुन काही बदल अथवा सुचना करावयाची असल्यास आपणांस कळविण्यात येईल. सदर बदल किंवा सुचित केलेनुसार आपण माहितीमध्ये बदल करुन माहिती अंतिम स्वरुपात या कार्यालयामार्फत मान्य झालेनंतर माहितीचे संपादनाचे कामकाज आपणांस करावयाचे आहे.

१०) उपरोक्त कामकाज करणेबाबत मा.कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे यांचा अंतिम निर्णय राहील त्यांनी सर्व अधिकारी राखून ठेवले आहेत.

११) दरपत्रकांना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास ही दरपत्रके (नोटीस) प्रक्रिया स्विकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे इत्यादी अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना रहातील.

१२) उपरोक्त काम झालेनंतर प्रत्येक रिपोर्ट ची एक प्रत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१३) देयक प्राप्त झालेनंतर अनुदानाचे उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी आरटीजीएस पध्दतीने आपले बॅक खातेवर करणेत येईल.

**कार्यकारी संचालक**
**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,पुणे**

E:Bharti/UNFPA/UNFPA 2016 /Newsletter 2016 note